# मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

**कार्यकारी अभियंता ग-दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरुस्तीव पुर्नरचना मंडळ, ५वा मजला, मुक्तांगण शाळेच्या बाजुला, विश्‍वराजा दर्शन इमारतीच्या मागे, प्रभादेवी (प), मुंबई - ४०० ०१३.**

दुरध्वनी क्रं. ०२२-२४३०१०११ ई-मेल : rreegsmhada@gmail.com

## ई-निविदा क्र. ०१ (२०२२-२३)

निम्नस्वाक्षरीकार, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ यांचे वतीने विहित अटी व शर्तीनुसार मुंबई बेटावरील ग-दक्षिण विभागांतर्गत कामांकरीता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या मुंबई शहर जिल्ह्यांतर्गत नोंदणीकृत **मजूर सहकारी संस्था** यांजकडून खालील पुनर्रचित इमारतीच्या कामाकरीता ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

मा. उपाध्यक्ष/प्रा.याच्या मान्यतेने पत्रक क्र.CE-1/A/72/18 दि.०८.०२.२०१८ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन निवीदा भरावे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **निविदा रक्कम (रुपये)** | **इसारा रक्कम (१ टक्का) (रुपये)** | **सुरक्षा अनामत (१ टक्के) (रुपये)** (५०% प्रथम व ५०% देयकातून) | **निविदा शुल्क (रुपये)** | **मुदत** | **नोंदणी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | ग- दक्षिण् विभागांतील विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारत शिवरत्न, करीरोड, या पुनर्रचित इमारतीची दुरुस्ती करणे — खोल्यांमधील सिलिंग व बीमची दुरुस्ती करणे. ए आणि बी विंगच्या जिन्याची दुरुस्ती करणे. तसेच संडास व नहाणी मधील गळती रोखणे. | २३१४४१३/- | निरंक | २४०००/- | ५९०/- | १८ महिने | वर्ग — अ |
| २) | ग- दक्षिण् विभागांतील विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारत गणेश प्रभा, या पुनर्रचित इमारतीची दुरुस्ती करणे — अंतर्गत व बाह्य संरचनात्मक दुरुस्ती करणे. ड्रेनेज सिस्टीम व इतर कामे करणे. | २४,७१,८९८/- | निरंक | २५०००/- | ५९०/- | १८ महिने | वर्ग — अ |
| ३) | ग- दक्षिण् विभागांतील विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारत त्रिशूल -२ या पुनर्रचित इमारतीची दुरुस्ती करणे — दुसऱ्या व पाचव्या मजल्यावरील शौचालय व नहाणींची दुरुस्ती करणे. | २५,०४,३००/- | निरंक | २६०००/- | ५९०/- | १८ महिने | वर्ग — अ |
| ४) | ग- दक्षिण् विभागांतील विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारत श्री सिद्धिविनायक कृपा या पुनर्रचित इमारतीची दुरुस्ती करणे — अंतर्गत व बाह्य दुरुस्तीचे काम करणे. ड्रेनेज सिस्टीम व इतर कामे करणे. | २८,६१,६६३/- | निरंक | २९०००/- | ५९०/- | १८ महिने | वर्ग — अ |

| **अनु. क्र.** | **प्रक्रीया** | **दिनांक व वेळ** |
|---|---|---|
| १) | प्रकाशन दिनांक | २०/०४/२०२२, सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| २) | निविदा विक्री सुरुवात | २०/०४/२०२२, सकाळी १०.०५ वाजल्यापासून |
| ३) | देकार सादर सुरुवात | २०/०४/२०२२, सकाळी १०.०५ वाजल्यापासून |
| ४) | निविदा विक्री शेवट | ०४/०५/२०२२, सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| ५) | देकार सादर शेवट | ०४/०५/२०२२, संध्याकाळी ३.३० वाजेपर्यंत |
| ६) | तांत्रिक देकार उघडण्याची वेळ | ०५/०५/२०२२ संध्याकाळी ३.३० वाजल्यानंतर |
| ७) | आर्थिक देकार उघडण्याची वेळ | ०६/०५/२०२२, सकाळी ११.०० वाजल्यानंतर |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई-टेंडरिंग) दोन लिफाफे पध्दतीची असेल, निविदेसंबंधी अधिसुचना अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाची वेबसाईट https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द होईल.

२. निविदासंबंधीत दस्तऐवज वेबसाईट http://mahatenders.gov.in यावर पाहून डाऊनलोड/अपलोड करता येईल, तसेच निविदा फॉर्म दिनांक २०/०४/२०२२ (सकाळी १०.०० वाजेपासून) ते दिनांक ०४/०५/२०२१ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) वेबसाईट वरुन डाऊनलोड करता येईल.

३. निविदे सोबत वरील प्रमाणे शुल्क व इसारा रक्कम पुढील पध्दतीने भरावी लागेल. SBI Net Banking or Other Net Banking द्वारे पेमेंट भरावे.

४. तांत्रिक निविदा दिनांक ०५/०५/२०२२ रोजी संध्याकाळी ३.३० वाजता कार्यकारी अभियंता, ग-दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, ५वा मजला, मुक्तांगण शाळेच्या बाजुला, विश्वराजा दर्शन इमारतीच्या मागे, प्रभादेवी (प), मुंबई - ४०० ०१३ यांचे दालनात वेबसाईट http://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.

५. निविदाकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती .pdf फॉरमॅटमध्ये तांत्रिक लिफाफयामध्ये सादर करावी.

६. सॉलव्हन्सी सर्टीफिकेट.

१) म्हाडा व पी.डब्ल्यू.डी. सहीत सर्व ठेकेदारांनी / निविदाकारांनी तांत्रिक कागदपत्रांसोबत कामाच्या रकमेच्या २०% रकमेएवढे सॉलव्हन्सी सर्टीफिकेट सादर करावे.

२) सॉलव्हन्सी सर्टीफिकेट राष्ट्रीयकृत अथवा शेडुल्ड बॅंकेचे असावे व त्याच्या ०१ वर्षाच्या वैद्यता कालावधीकरीता असलेले ग्राहय धरण्यात येईल.

३) न्युनतम निविदाकाराने त्याच्या निविदा स्विकृती नंतर पतवारी प्रमाणपत्राची मुदत ही प्रत्यक्ष काम पुर्ण होण्याच्या दिनांक अथवा काम पुर्णत्वाच्या दिनांक यापैकी जे उशीरा असेल त्या दिनांकापर्यत मुदतवाढ घेणे क्रमप्राप्त आहे.

४) पतवारी प्रमाणपत्र स्कॅन करुन ई-निविदा भरताना सोबत जोडणे (Upload) करणे तसेच सिलबंद लिफाफयात सादर करणे आवश्यक आहे. ज्या ठेकेदारांनी / निविदाकारांनी सॉलव्हन्सी सर्टीफिकेट सादर केले नसेल, त्यांची निविदा देकार उघडण्यात येणार नाही.

५) पतवारी प्रमाणपत्र हे बॅंकेच्या पुष्टीकरण पत्रासोबत सादर करावे.

७. परफॉर्मन्स सेक्युरिटी

अ. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमंतीपेक्षा १० % पर्यत कमी दराचा असेल तर ठेकेदारानी निविदाधीन किमंतीच्या १% एवढया रक्कमेचा धनाकर्ष परफॉर्मन्स सेक्युरिटी म्हणून ( सुरक्षा अनामत रक्कम वगळून ) तिसरा बंद लिफाफामध्ये प्रमाणित प्रतवारी प्रमाणपत्रासह सादर करावयाचा आहे सदर प्रमाणपत्र डी. डी. व सॉल्वनशी हयांना लागू आहे.

ब. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमंतीपेक्षा १० % पेक्षा कमी दराने असेल तर देकार १० % पेक्षा जेवढया रक्कमेचा वरील बाब ( अ ) प्रमाणे येणा-या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष तिस-या बंद लिफाफामध्ये सादर करावे. ( उदा. १४% कमी दरासाठी परफॉर्मन्स सेक्युरीटी = ( १४% - १०% ) +१% = ५% ).

क. धनाकर्ष उपलब्ध करुन देणे बाबीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) धनाकर्ष हे मुख्य लेखाधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचे नावे असावा.

२) धनाकर्ष हे राष्टीयकृत अथवा शेडयुल बॅंकेकडून काढलेला असावा.

३) धनाकर्ष हे निविदा भरण्याचा दिनांकानंतर किमान ३ महिने वैध असावा.

८ निविदाकारासाठी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

१. जीएसटीच्या नियमावलीचे पुरविण्यात आलेल्या स्वरुपाप्रमाणे देयकामध्ये वाढ करण्यात येईल.

२. निविदाकारानेसादर केलेली माहिती वस्कॅन केलेल्या प्रती .RAR फॉरमॅटमध्ये तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावी.

९ निविदाकाराने दुस-या लिफाफ्यामध्ये सर्व कर समाविष्ठ टक्केवारी दर अपलोड करावेत.

१० निम्नस्वाक्षरीकार हे कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.

११ निविदेसंबंधी कागदपत्रे व ऑनलाईन निविदासादर करणेबाबत आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याकरीता वेबसाईट http://mahatenders.gov.in वर संपर्क साधावा.प्राधिकरणाच्या/ शासनाच्या वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रक तसेच मार्गदर्शक सुचनां नुसार निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता,**
ग-दक्षिण विभाग, मुं.इ.दु.व पु.मंडळ.